# दैनंदिन
# संत तुकाराम गाथा



**बाळ द. चित्रुक**

**ॐ पब्लिकेशन्स्**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**दैनंदिन संत तुकाराम गाथा : Dainandin Sant Tukaram Gatha**
बाळ द. चित्रुक

© **बाळ द. चित्रुक**
२६२८, डी वॉर्ड,
जुना बुधवार पेठ, कोल्हापूर.

**प्रकाशक**
ॐ पब्लिकेशन्स्
६७८, सृष्टी विष्टा, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
₹ २३०/-

# धांडोळा

**सं**त तुकाराम गाथा म्हणजे बहुजनांची गीता होय. महाराष्ट्राच्या पावन भूमीत गेली चारशे वर्षे मुक्तीची ज्ञानगंगा वाहत आहे. ज्ञानबा-तुका म्हणजे महाराष्ट्राची सांस्कृतिक विद्यापीठे आहेत. त्यांचे साहित्य म्हणजे आध्यात्मिक ज्ञानाचा आधारवड आहे. अभंग आणि ओवी तळागळातील समाजात ठाण मांडून बसले आहेत. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाची बाग बहरलेली आहे. अभंगाची भाषाशैली सरळ व सोपी आहे. मुखात रुळणारी आहे. कानात गुंज घालणारी आहे.

महाराष्ट्रातील देवगिरीच्या यादवांचा अस्त झाल्यानंतर महाराष्ट्रात सर्वत्र अंदाधुंदीचा कारभार सुरू झाला. बहुजन समाजाचे आर्थिक, धार्मिक शोषण सुरू झाले. गुलामगिरीचे जू बहुजनांच्या मानेवर लटकत होते. धर्मसत्ता प्रबळ झालेली होती. हिंदू धर्माला कर्मकांडाची जळमटे चिकटलेली होती. देव, धर्म, प्रथा, रूढी याने समाज गांजलेला होता. अंधश्रद्धेने सारा समाज पोखरलेला होता. परकीय सत्ता बळकट झाली होती. समाजातील सत्त्व आणि स्वाभिमान पिचत होता. आदिलशाही, निजामशाही, मोंगलशाहीचा विळखा घट्ट झालेला होता. मावळ मराठे वतनासाठी आपआपसात लढत होते. स्वकीय कोण ? परके कोण ? ओळखत नव्हते. हिंदू धर्मातील सनातनी लोकांनी चातुर्वर्ण्याची चौकट बळकट केली होती. त्यामुळे समाजात एकता नांदत नव्हती. अशा या कालखंडात एक दिव्य ज्योत उदयाला आली, ती म्हणजे संत ज्ञानेश्वर, धर्मक्रांतीचा पहिला बंडखोर संत होय. मराठी भाषेतील हा पहिला धर्मग्रंथ होय. त्याने आध्यात्मिक क्रांतीची पहिली ज्ञानज्योत प्रज्वलित केली. तत्कालीन सनातनी धर्ममार्तंडांनी ज्ञानेश्वरांचा अतोनात छळ केला. परंतु ज्ञानेश्वरांनी धर्मशास्त्रानुसार सडेतोड उत्तरे दिली. सात शतके ती ज्ञानज्योत

तेवत राहिली. यातच त्यांचे थोरपण आहे. धर्माला चिकटलेली वावटुमुळे कालबाह्य झाली. ज्ञानेश्वरांनंतर जर्नादन स्वामी, एकनाथ, नामदेव, तुकाराम यांनी भागवत धर्माची पताका सर्वत्र फडकविली. भागवत धर्माचा कळस म्हणजे संत तुकाराम. बहुजन समाजात पसरलेली धर्म-कर्मकांडाची जळमटे आपल्या कीर्तनातून पुसून टाकली. अभंगवाणी महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यात पसरली. अभंगवाणीतून सत्य धर्माची शिकवण जगाला दिली. सामाजिक परिवर्तनाचे वादळ सर्वत्र पसरले. या वादळाला थोपविण्यासाठी सनातनी धर्ममार्तंडांनी कल्लोळ केला. कटकारस्थाने रचली गेली. अशा अनेक संकटांतून नव्हे अग्निदिव्यातून जात असताना अभंग सतत गर्जत राहिला. जाती- धर्माची उतरंड त्यांनी मोडून काढली. गुलामगिरीची (राजकीय, धार्मिक व आर्थिक चौकट खिळखिळी केली. बहुजन समाजात स्वाभिमानाची ज्योत पेटविली.)

अशा या कालखंडात युगपुरुष छ. शिवाजी महाराज जन्माला आले. डोंगरकपारीत पसरलेल्या मावळ मराठ्यांना संघटित करून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. अशा या थोर, पराक्रमी छ. शिवाजी महाराजांची आणि जगद्‌गुरू संत तुकारामांची भेट झाली होती. संत तुकाराम अभंगवाणी, कीर्तनाच्या माध्यमातून राष्ट्रधर्माची शिकवण देत होते. त्यांनी हिंदू धर्मात पिचत पडलेला बहुजन जागृत केला. देव आणि धर्म यासंबंधी ठोस मते लोकांना पटवून दिली. देवधर्मातील भोंगळ समजुती गाडण्याचा प्रयत्न केला. तत्कालीन धर्ममार्तंडांनी खूप विरोध केला. विरोधक नमले. अभंग अभंग राहिले, संत तुकारामाचे धर्मक्रांतीचे समाजप्रबोधन आजही मार्गदर्शक ठरले आहे. त्यांचे अभंग मानवी जीवनाला उपकारक ठरले आहेत. लौकिक अर्थाने संत तुकाराम आठव्या पिढीतील नायक होते. त्यांची वंशावळ पाहिली असता त्यांच्या घराण्यात वारकरी संप्रदाय अखंडपणे चालत आलेला होता. संत तुकाराम चरित्रावरून त्यांची वंशावळ खालीलप्रमाणे आढळून येते. मूळ पुरुष विश्वंभर. पत्नी आमाबाई, हरि आणि मुकुंद अशी त्यांची दोन मुले होती. ही दोन्ही मुले लढाईत मारली गेली. तत्कालीन रूढीप्रमाणे मुकुंदाची पत्नी सती गेली. हरीची पत्नी गरोदर असल्याने सती गेली नाही. 'हरीला' विठोबा नावाचा मुलगा झाला. विठोबाचा-पदाजी, पदाजीचा-शंकर, शंकरचा-कान्होबा, कान्होबाचा-बोल्होबा, बोल्होबाचा-

संत तुकाराम, आठव्या पिढीतील संत तुकारामाचे उपनाम मोरे होते. वंशपरंपरेने घरी वाण्याच्या दुकानाचा व्यवसाय चालू होता, सावकारकीही होती. पुण्यापासून १५-२० कि.मी. अंतरावर इंद्रायणीकाठी देहू गाव वसलेले आहे. संत तुकारामाचे मूळ पुरुष विश्वंभर यांनी गावात विठोबाचे देऊळ बांधलेले होते. घराण्यात वारकरी संप्रदाय अखंड चालत आलेला होता, असा उल्लेख महिपतीकृत संत तुकाराम चरित्रात सापडतो. संत तुकारामाच्या घराण्यात आठ पिढ्या सावकारकी होती. ते सावकारांचे सावकार होते. ते महाजन होते. घरात श्रीमंती नांदत होती. कोणत्याही गोष्टीची ददात नव्हती. घरी नोकर-चाकरांची मांदियाळी होती असे असूनसुद्धा संत तुकाराम सर्व गोष्टींपासून विरक्त राहिले. संसार असूनसुद्धा त्यांनी आयुष्य परमार्थाकडे वाहिले. सर्व समाज श्रीमंत असावा अशी त्यांची धारणा होती. गरिबीविषयी कळवळा होता. महासागरासारखे त्यांचे अंत:करण माणुसकीने उचंबळत होते. ते व्यवहारी होते. भाऊकीच्या हिश्श्याला जे वाटणीला आले होते त्या उधार-उसनवारीच्या वह्या त्यांनी इंद्रायणीत बुडविल्या. कर्जदारांचे कर्ज माफ करणारा हा जगातील पहिला संत होय. जगात समता नांदावी अशी त्यांची मनोकामना होती. तो संसारातील विरक्तीचा महामेरू होता. महात्मा गौतम बुद्धाने जसे राजऐश्वर्याचा त्याग केला तसा संत तुकारामांनी संसारातील सुख-दु:खाचा त्याग केला. जगाचा संसार सुरळीत चालण्यासाठी त्यांनी अमोल अभंगाद्वारे मानवाला मार्गदर्शन केले आहे. परंतु समाजातील काही विकृत विकाराच्या सनातनी लोकांनी संत तुकारामांना बावळा ठरविले. अनेक कट-कारस्थाने रचली. संत तुकारामांना चार मुले होती. कन्या भागिरथी, काशी व मुलगे नारायण आणि महादेव पैकी दोन आजाराने मरण पावली. पहिली बायको मेल्यानंतर त्यांची दुसरी बायको पुण्यातील अप्पाजी गुळवे यांची कन्या अवलाई ऊर्फ जिजाऊ ती स्वभावाने खाष्ट होती. परंतु सती सावित्रीसारखी पतिव्रता होती. संत तुकारामांचा संसार सांभाळला. त्यांची विरक्ती सांभाळली. संत तुकाराम भांडारा डोंगरावर आत्मचिंतनासाठी १३ दिवस ध्यानस्थ होते. ईश्वराची करुणा भाकत चिंतनात गुंतले होते. त्यांची सर्व देखभाल जिजाऊ करीत होती. संत तुकारामांनी स्वत:चा संसार सुखाचा करण्यापेक्षा जगाच्या कल्याणासाठी कीर्तनातून अभंगवाणी अखंड गर्जत राहिली. लौकिक अर्थाने ते माया- जालात गुंतले नाहीत.

जग उद्धारासाठी त्यांचे कार्य अमोल आहे. संत तुकारामांनी एक कोटी अभंग रचले होते. त्यापैकी साडेचार हजार अभंग उपलब्ध आहेत.

संत तुकारामांचा कट्टर विरोधक विद्वान पंडित 'रामेश्वर भट्ट' याला सरकार दरबारी मोठा मान होता. परकीय सत्तेचा तो गुलाम होता. संत तुकारामाला छळण्यासाठी त्याने युक्त्या योजल्या होत्या. संत तुकारामाचे अभंग इंद्रायणीत बुडवण्याची कल्पना त्याचीच. संत तुकारामांचा ऐहिक संसार उद्ध्वस्त झालेला होता. इंद्रायणीत अभंग बुडवून परमार्थही बुडविला. महाराष्ट्राचे थोर भाग्य म्हणूनच साडेचार हजार अभंग सुरक्षित राहिले. अभंग तरले हा लोकांना चमत्कार वाटत असला तरी सत्य हे वेगळेच आहे. संत तुकारामांचे शिष्य केशवजी जगनाडे यांनीच बुडालेले अभंग बाहेर काढून सुरक्षित ठेवले. एक कोटी अभंगांपैकी साडेचार हजार अभंग कोरडे राहिले. संत तुकाराम महाराज भंडारा डोंगरावर जाऊन बसले होते. ईश्वराची करुणा भाकत ईशचिंतनात गुंतले होते. शिष्याने आणलेले कोरडे अभंग पाहून त्यांना आनंद झाला. त्यांनी शिष्याला कडकडून मिठी मारली, विठोबा पावला असे सहज उद्‍गार त्यांच्या तोंडून निघाले. तत्कालीन विरोधी ब्राह्मणांनी या गोष्टीला चमत्काराचा लेप लावला. तो आजही तसाच आहे. शेवटी रामेश्वर भट्टाला उपरती झाली. त्यांनी संत तुकारामाचे संतपण मान्य केले. त्यांचे माहात्म्य पटविण्यासाठी संत तुकारामांवर ४२ अभंगांची रचना केली, त्यातील निवडक अभंग पुढीलप्रमाणे –

*रामेश्वर भट कृत अभंग*
*पंडित वैदिक अथवा दशग्रंथी ।*
*परी सरीन पवती तुकोबाची ।।*
*शास्त्र ही पुराणे गीता नित्य नेम ।*
*वाचिताली वर्म न कळे त्यासी ।।*
*कर्म अभिमाने वर्ण अभिमाने ।*
*नाडले ब्रह्मण कलियुगे ।।*
*तैसा नव्हे तुकावाणी व्यवसाई ।*
*भाव त्याचा मनी विठोबाचे ।।*

*अमृताची वाणी वरुषला शुद्ध ।*
*करी त्या अशुद्ध ऐंसा कोण ।।*
*चहू वेदाचे केले विवरण ।*
*अर्थ ही गहन करुनीया ।।*

संत तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात 'देव पाहावया गेलो। देव होऊनिया गेलो।' माणसाचा देव बनण्याचे सामर्थ्य अभंगात आहे. अभंग हे महासागरातील दीपस्तंभाप्रमाणे मानवाला मार्गदर्शक आहेत. श्रद्धा, देव आणि धर्म याविषयी सुरेख मार्गदर्शन अभंगातून व्यक्त होते. स्वार्थ परमार्थाचे शिक्षण आणि संस्कार अभंगातून घडतात. संत तुकारामांची ख्याती जगभर पसरलेली आहे.

विज्ञानामुळे मानवी जीवन गतिमान झाले आहे. माणसाला क्षणभर उसंत मिळत नाही. जगण्यासाठी माणसाला खूप धडपड करावी लागते. देव आणि धर्माचे पालन करायला वेळ नसतो. ऐहिक सुखाची लालसा वाढलेली आहे. त्यामुळे आध्यात्मिक क्षेत्राकडे कोणी जाण्याचा प्रयत्न करीत नाही. त्यामुळे जीवनात समाधान, शांती लाभत नाही. संत तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात, 'ठेविले अनंते तैंसेची राहावे। चित्ती असू द्यावे समाधान।' अशा गतिमान जगात संतांनी सांगितलेला भक्तिमार्ग सरळ सोपा आहे. प्रपंचातून परमार्थाकडे जाण्याचा भक्तिमार्गाशिवाय दुसरा उपाय नाही. माणसाला सुख आणि शांती लाभण्यासाठी संतसाहित्यच उपयोगी आहे. संत तुकाराम महाराजांनी 'राम कृष्ण हरि' हा साधा मंत्र दिला आहे. हा मंत्र उच्चारायला काल, स्थिती, सोवळे-ओवळे याचे बंधन नाही. संत तुकारामांच्या साडेचार हजार अभंगां- विषयीची सुसंगत मांडणी नाही. त्यांच्या सहज बोलण्यातून अभंगरचना होत असे. दैनंदिन अभंगगाथेसाठी मी ३४१ अभंग निवडले आहेत. काम मोठे असल्याने परिश्रमाचे वाटले. परंतु दीर्घकाल अभ्यासानंतर दैनंदिन गाथा तयार झाली. अभंगांची मांडणी करताना चार विभाग केले. एक देव स्वरूप, दोन भक्ती, तीन करुणा, चार उपदेश असे अभंग निवडले. काम मोठे किचकट परंतु दीर्घ प्रयत्नाने सफल झाले, ही ईश्वरकृपाच होय. वरील चार विषयांनुसार निवड करताना कदाचित अभंग इकडे-तिकडे होण्याचा संभव आहे. मी एक सामान्य भक्त आहे. अभंग जसे मला भावले तशी त्याची निवड केली आहे. (अर्थासह)

१ जानेवारी ते ३१ डिसेंबरअखेर दररोज एक अभंग अर्थासह देण्याचा प्रयत्न मी केलेला आहे. वाचकांना संपूर्ण गाथा वाचल्याचे श्रेय लाभेल असे मला वाटते आणि सात्त्विक समाधान मिळेल. वाचकांनी रोज ५-१० मि. यासाठी वेळ खर्च करावा. नवी ऊर्मी, नवा उत्साह दैनंदिन जीवनात प्रगट होईल.

***जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।***
***तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।।***

या अभंगात गाथेचे सार सांगितले आहे. हा नवीन उपक्रम विठ्ठलभक्तांना पसंत पडेल. सर्व संत, भक्त, वाचक याचा आनंदाने स्वीकार करतील अशी मला आशा वाटते. हा उपक्रम विठ्ठलभक्तांच्या चरणी सर्मपण !

✦✦✦

# देव स्वरूप

परमेश्वर अमूर्त आहे. चैतन्य स्वरूपात त्याचे अस्तित्व माणसाला जाणवते. वेद-शास्त्राच्या अनुषंगाने देवाच्या मूर्तीची कल्पना अस्तित्वात आणली. चैतन्य मूर्तिस्वरूपात प्रगटले. जागृत स्थान म्हणून त्याची पूजा-अर्चा सुरू झाली. सर्व ब्रह्मांड चैतन्याचे मूळ आहे. जिवाचे आणि शिवाचे नाते असेच आहे. जिवाला स्वास्थ्य मिळण्यासाठी वेगवेगळ्या संकल्पना तयार झाल्या. त्या संकल्पनेतून प्रतिभेच्या बळावर देवाच्या मूर्ती बनल्या. मूर्तीची पूजा, अर्चा, देवाची स्तुती करणारी मंत्रपठणाची एक जमात निर्माण झाली. भक्तीची वहिवाट सुरू झाली. वहिवाटीचे मालक पुरोहित बनले. ज्ञानेश्वर माउलीने भक्तीचे चार प्रकार ज्ञानेश्वरीत सांगितले आहेत. ते असे- सरलता, समीपता, स्वरूपता आणि सायुज्यता. समाजाचा जसा-जसा विस्तार होऊ लागला, तसा-तसा समाजात भेदभाव वाढू लागला. देवाची पूजा, अर्चा करणारे पुरोहित लोकांना लुबाडू लागले. सरलता भक्ती असणारे लोक नागवले गेले. समीप भक्ती करणारे पुरोहित त्यांचा छळ आणि शोषण करू लागले. देव आणि धर्माचे स्तोम माजले. देवाचे देवपण सोवळ्या-ओवळ्यात झाले. देवाचे आणि धर्माचे अस्तित्व, समाजस्वास्थ्यासाठी असते याचा विसर पुरोहितांना पडला. कालांतराने समाजात योगसाधनेच्या जोरावर साधु-बुवा व स्वामी यांचा स्वतंत्र सुभा निर्माण झाला. सिद्धीच्या आणि चमत्काराच्या गोष्टी सांगून बहुजनांना नाडवले. संसारातील क्षणभंगुर सुखासाठी अंगारा, धुपारा, गंड दौर यांचे प्रस्थ वाढले. बुवाची साथ बहुजन समाजात पसरली. सामान्य माणूस पिळला गेला. श्रेष्ठ कनिष्ठ या भावनेने, विचाराने जातिभेद पसरले. कर्मकांड आणि विधीने देव झाकले गेले. देव आणि माणूस यातील दलालांची चंगळ झाली. देवाच्या मूर्ती आणि देवळे सुशोभित झाली. देवतांची

भव्यता वाढली. माहात्म्य वाढले. सर्व अज्ञानी समाज आकर्षित होऊन पिळला गेला. देवपण विसरून देव गाभाऱ्यात कोंडला गेला. सायंकाळी आकाशात ढगांचे रंग पालटतात तसे देव आणि देवळांचे रंगरूप पालटले. देव आणि धर्म विविधता आढळू लागली. श्रेष्ठपणाच्या कारणावरून समाजाता संघर्ष सुरू झाला. जगात अनेक धर्मयुद्धे झाली. कर्मकांडाने पुरोहितांची तुंबडी भरू लागली. देव एकच आहे असे जगातील सर्व धर्म मानतात. परंतु अशा अमूर्त देवाविषयी प्रत्येक धर्माची वेगळी तऱ्हा आढळून येते. देव म्हणजे शक्तिपीठ आहे. त्या शक्तीचा विस्तार वाढत गेला. प्रत्येक कर्मकांडात कथा निर्माण झाल्या. त्याच कथांना देवत्व प्राप्त झाले. त्या कथेविषयी सत्यार्थ कोणी शोधला नाही. त्यामुळे समाजात अनेक प्रथा व रूढीने समाजाला ग्रासले. प्रथा व रूढी आजतागायत शिल्लक आहेत. भक्तीचे तिसरे स्वरूप म्हणजे स्वरूपता. स्वत: देवाचे अवतार समजून व्यवहार सुरू झाले. साधूचा, बुवाचा अनुग्रह होण्यासाठी समाजातील सामान्य माणसे वाटेल ती टोकाची भूमिका घेऊ लागली. बुवांनी अज्ञ समाजाचे शोषण सुरू केले. योग्याच्या देहासंबंधी असलेले वलय बहुजनांना खुलवू लागले. त्याची शहानिशा कोणी केली नाही. करणाऱ्या व्यक्तीला नास्तिक समजू लागले. समाजात काही सगुणाची तर काही निर्गुणाची पूजा करू लागले. त्यामुळे समाजात दोन तट निर्माण झाले. त्यांचा संघर्ष अधून-मधून आढळून येतो. शतकान शतके पिचत पडलेल्या समाजात बाराव्या शतकात धर्मक्रांती झाली. संत ज्ञानेश्वरांनी देव आणि धर्म काय आहे याचे स्पष्ट मार्गदर्शन केले. परंतु सनातनी धर्ममार्तंडांनी त्यांचा अतोनात छळ केला. बालवयातच वेदांताचा टेंभा मिरवणाऱ्या धर्ममार्तंडांना धर्माचा खरा अर्थ सांगितला. विश्व बंधुत्वाची पताका घेऊन भागवत संप्रदाय सुरू केला. ज्ञानेश्वरीसारखा धर्मग्रंथ लिहून लोकांना जागृत केले. धर्मासंबंधी असलेल्या वेडगळ समजुतींवर प्रहार करून भागवत धर्माची शिकवण दिली. या त्यांच्या कार्याविषयी पुष्कळ सांगण्यासारखे आहे. ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माचा पाया घातला. पुढे पंधराव्या शतकात संत तुकारामांनी तसेच चोखामेळा, सावता माळी, गोरा कुंभार, दादू पिंजारी अशा अनेक संतांनी भागवत धर्माची पताका फडकत ठेवली. हे महाराष्ट्र भूमीचे भाग्यच म्हणावे लागेल. महाराष्ट्रातील हे संतांचे कार्य बहुमोल आहे. माणूस जन्माला येऊन संसार करतो.